# महाराष्ट्र शासन

क्रमांक:-इबांका-२०२१/प्र.क्र. ८४/काम-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०२२.

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कमगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी- २२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तू संच वाटपाबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र समक्रमांक दिनांक २१.०६.२०२२
२. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र./संच वाटप/प्र.क्र.१०८/ योजना-०१/२०२२/१७८, दिनांक २२.०६.२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भीय क्र. (१) येथील शासन पत्रान्वये दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत नोंदणी तथा नुतनीकरण झालेल्या परंतु संच वाटप न झालेल्या शिल्लक वाटप करावयाचे १,८९,१७५ इतके संच वगळता अधिकचे ३,९४,४९३ इतक्या नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थ्यांना संच वाटप करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

आता संदर्भीय क्र.(२) येथील पत्रान्वये आपण सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन आपणास असे कळविण्याचे निर्देश आहेत की, दि.३१.०३.२०२२ च्या आधी व वाटप करेपर्यत नोंदीत व नुतनीकरण झालेल्या सर्व बांधकाम कामगारांना उर्वरीत १,८९,१७५ संच व अधिकचे ३,९४,४९३ संच असे एकूण ५,८३,६६८ संच वाटपाच्या मर्यादेपर्यंत सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तू संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ
आवक क्र. २२७१ (8)
दि. 23 JU...
आवक लिपिक स्वाक्षरी

आपला,

(दा.सो.खताळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- १.कामगार आयुक्त, कामगार भवन,बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
२.निवडनस्ती : कामगार-७

H:\Safety & Essential Kit\G.R.2022\Essential & Safety Kit.docx